# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

- **मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त यांनी पावसाळापूर्व नालेसफाईचा घेतला आढावा**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने मान्सूनपूर्व कामांचा आढावा घेण्यात येत आहे. त्याअनुषंगाने, लोकसभा सार्वत्रिक निवडणुकी दरम्यान सोपविलेली जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडून मिरा भाईंदरमध्ये परतलेल्या मा. आयुक्त संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी शहरातील विविध भागातील नालेसफाईच्या कामांची तसेच पाणी साठणाऱ्या संभाव्य ठिकाणांची पाहणी केली. मा. आयुक्त यांनी वेस्टर्न हॉटेल, काशिमीरा, मिरा भाईंदर रोड, मिरा रोड स्मशान भूमी येथील उघाडी, रेल्वे समांतर नाला इत्यादी ठिकाणी पाहणी केली. पाहणी दरम्यान अतिरिक्त आयुक्त अनिकेत मानोरकर, उपायुक्त डॉ. सचिन बांगर, शहर अभियंता दिपक खांबीत व महापालिका स्वच्छता निरीक्षक उपस्थित होते.

पावसाच्या पाण्याचा त्वरीत निचरा होईल आणि रस्ते जलमय होणार नाहीत याची खबरदारी घ्यावी, तसेच ड्रेनेज व पाणी पुरवठा विभागाची प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्यात यावीत, अशा सूचना त्यांनी यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. पावसाळयात पाणी साचणे टाळण्यासाठी, पुराचा धोका कमी करण्यासाठी तसेच डासांचा प्रादुर्भाव कमी करून सार्वजनिक आरोग्य सुधारण्यासाठी मान्सूनपूर्व नालेसफाईची कामे वेळेत पूर्ण होणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने , मिरा भाईंदर महानगरपालिकेकडून होणारी नालेसफाईची कामे युद्धपातळीवर सुरू आहेत. सद्यास्थितीमध्ये ८५% नाले सफाईची कामे पुर्ण करण्यात आलेली असुन उर्वरित कामे ताडतीने पुर्ण करण्याच्या सुचना मा. आयुक्त यांनी दिल्या. तसेच मेट्रो नॅशनल हायवे येथील कामांची पाहणी मा. आयुक्त यांनी करुन सदरची कामे पावसाळयापुर्वी करुन त्याठिकाणी पाण्याचा निचरा व्यवस्थित होईल याबाबत संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना सुचना देण्यात आल्या.

पूरसदृश्य परिस्थिती टाळण्यासाठी पावसाळ्यात जमा होणाऱ्या कचऱ्याचा योग्य निचरा होणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने, मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील सर्व नागरिकांनी आपल्याजवळ जमा होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावावी, असे आवाहन मा. आयुक्त महोदयांनी केले आहे.

नालेसफाई विषयक सुचना असल्यास **टोल फ्री १८००२२४८४९ या नंबरवर** संपर्क साधवा. मिरा भाईंदर शहराला स्वच्छ व निरोगी राखण्यासाठी नागरिकांचे सहकार्य व सहभाग अपेक्षित आहे. नागरिकांनी स्वच्छता विषयक नियमांचे व आवश्यक सूचनांचे पालन करून महानगरपालिकेस सहकार्य करावे.